पुण्य नगरी

# 'एनडी स्टुडिओ नवीन वर्षात पुन्हा उभा राहणार'

**। खोपोली** : खालापूर तालुक्यातील कर्जत मार्गावर असणाऱ्या एनडी स्टुडिओचे मालक नितीन देसाई यांच्या निधनानंतर या स्टुडिओमधील सर्व शूटिंग, कार्यक्रम ठप्प झाल्याने या ठिकाणी पडझड झाली आहे. देसाई यांच्या निधनानंतर शासनाने सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत एनडी स्टुडिओ ताब्यात घेऊन पुन्हा उभारणीला सुरुवात केली आहे. त्यामुळे २०२६ मध्ये पुन्हा स्टुडिओ उभा राहील, असा विश्वास सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

मराठी चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत एन.डी.आर्ट आर्ट वर्ड लिमिटेड येथे शुक्रवारी माध्यमांबरोबर टूर ऑपरेटर यांची भेट आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने आयोजित छोटेखानी सांस्कृतिक समारंभात डॉ. कुलकर्णी बोलत होते. कार्निव्हलच्या पोस्टरचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक तथा एनडीच्या सीईओ मीनल जोगळेकर, वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, उपअभियंता (स्थापत्य) विजय बापट, एनडीचे प्रशासकीय अधिकारी सचिन निबाळकर, श्रीकांत देसाई आदी उपस्थित होते.

एनडी स्टुडिओत २५ ते ३१ डिसेंबरदरम्यान सकाळी १० ते ५ या वेळेत कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्निव्हलमध्ये खेळ, मनोरंजनासह सेलिब्रेटीसोबत गप्पांचा कार्यक्रम नियमितपणे होणार आहेत. कार्निव्हलमध्ये सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कलावंतांची उपस्थिती असणार आहे.






पुण्य नगरी

# एनडी स्टुडिओ नवीन वर्षात पुन्हा उभा राहणार

## सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे संकेत

**। खोपोली** : खालापूर तालुक्यातील कर्जत मार्गावर असणाऱ्या एनडी स्टुडिओचे मालक नितीन देसाई यांच्या निधनानंतर या स्टुडिओमधील सर्व शूटिंग, कार्यक्रम ठप्प झाल्याने या ठिकाणी पडझड झाली आहे. देसाई यांच्या निधनानंतर शासनाने सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत एनडी स्टुडिओ ताब्यात घेऊन पुन्हा उभारणीला सुरुवात केली आहे. त्यामुळे २०२६ मध्ये पुन्हा स्टुडिओ उभा राहील, असा विश्वास सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी शुक्रवारी व्यक्त केला.



### २५ डिसेंबरपासून एनडी कार्निव्हल

◆एनडी स्टुडिओत २५ ते ३१ डिसेंबरदरम्यान सकाळी १० ते ५ या वेळेत कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्निव्हलमध्ये खेळ, मनोरंजनासह सेलिब्रेटीसोबत गप्पांचा कार्यक्रम नियमितपणे होणार आहेत. कार्निव्हलमध्ये सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कलावंतांची उपस्थिती असणार आहे. कविता लाड, सुव्रत जोशी, सखी गोखले, अदिती सारंगधर, विराजस कुलकर्णी, उर्मिला कोठारे, विक्रम गायकवाड, आनंद इंगळे, डॉ. गिरीश ओक, संजय मोने सहभागी होणार आहेत.

मराठी चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत एन.डी.आर्ट आर्ट वर्ड लिमिटेड येथे शुक्रवारी माध्यमांबरोबर टूर ऑपरेटर यांची भेट आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने आयोजित छोटेखानी सांस्कृतिक समारंभात डॉ. कुलकर्णी बोलत होते. शासनाने पुढाकार घेऊन एनडी स्टुडिओचे जतन आणि संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली आहे. कार्निव्हलच्या पोस्टरचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक तथा एनडीच्या सीईओ मीनल जोगळेकर, वित्तीय सल्लागार मुख्य लेखा वित्तधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, उपअभियंता (स्थापत्य) विजय बापट, एनडीचे प्रशासकीय अधिकारी सचिन निबाळकर, श्रीकांत देसाई आदी उपस्थित होते.